# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:13.08.2026** **वार:गुरुवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान करणार
2. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा आज अंतिम दिवस
3. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसह कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करायला सरकार तयार असल्याचं केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांचं स्पष्टीकरण
4. वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे आज नवी दिल्लीत सृजन या विशेष कार्यक्रमाचं आयोजन आणि
5. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत तलवारबाजीत भारताला 3 सुवर्णपदकं, आतापर्यंत एकूण 29 पदकांची कमाई.

**<u>पुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत एका विशेष समारंभात 115 कलाकारांना 2024 आणि 2025 या वर्षांसाठीचे 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप' आणि 'अकादमी पुरस्कार' प्रदान करतील. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत आणि सांस्कृतिक राज्यमंत्री राव इंद्रजित सिंह उपस्थित राहतील. हे दिग्गज कलाकार संगीत, नृत्य, नाटक, लोककला, आदिवासी कला, बाहुलीनाट्य आणि नाट्यविषयक इतर कला प्रकारांच्या माध्यमातून सादर केल्या जाणाऱ्या कलाविश्वाचे प्रतिनिधित्व करतात.

**<u>संसद कामकाज</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. गेल्या महिन्याच्या 20 तारखेला हे अधिवेशन सुरू झालं होतं. राज्यसभेत आज 'खाणी आणि खनिजे सुधारणा विधेयक सादर करण्यात येईल.

दरम्यान, विद्यार्थी आंदोलन, राम मंदिर देणगी अपहार आणि इतर मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळं काल संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात वारंवार व्यत्यय आला. लोकसभेत काल खाणी, खनिजं विकास आणि नियमन दुरुस्ती विधेयक मंजूर झालं. तर परदेशी निधी नियमन विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला. राज्यसभेत राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ दुरुस्ती विधेयक आणि केरळ नामांतर विधेयकाला मंजुरी मिळाली. ही दोन्ही विधेयकं लोकसभेत आधीच मंजूर झाली आहेत.

**<u>अमित शहा</u>**

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसह कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करायला सरकार तयार आहे, सरकारकडं लपवण्यासारखं काहीही नाही, असं काल केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. संसदेत शहा यांच्या

उत्तराची वारंवार मागणी करणाऱ्या विरोधकांना उत्तर देताना ते बोलत होते. चर्चा सुरू झाल्यास ते सभागृहात उपस्थित राहून प्रत्येक सदस्याचं म्हणणं ऐकून घेतील आणि चर्चा पूर्ण झाल्यानंतर आज दुपारी 3 वाजता लोकसभेत निवेदन करतील, असंही शहा यांनी सांगितलं.

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवरील कथित पोलिस कारवाईची जबाबदारी सरकारनं स्वीकारावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली.

**पंजाब-पेपर लीक**

पंजबामध्ये जुलै महिन्यात 'बाबा फरीद युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस'द्वारे घेण्यात आलेल्या 'फार्मसी ऑफिसर' भरती परीक्षेतील कथित पेपर फुटीच्या प्रकरणावरून पंजाब सरकारनं जनतेची दिशाभूल केली आहे, असा आरोप भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी केला आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयानं या परीक्षेला स्थगिती दिली असून, ही परीक्षा आधीच का थांबवली गेली नाही आणि ती नव्याने घ्यावी का, असे प्रश्न न्यायालयानं उपस्थित केले असल्याचं त्यांनी सांगितलं.

**झारखंड आंदोलन**

झारखंडमध्ये अनेक फेऱ्यांच्या चर्चा आणि विधानसभेच्या घेरावानंतरही सरकार आणि आंदोलनकर्ते विद्यार्थी यांच्यात कोणताही तोडगा निघालेला नाही. विद्यार्थी 2024 च्या जेएसएससी-सीजीएल परीक्षा रद्द करण्याची मागणी करत आहेत. तसंच सर्व वादग्रस्त परीक्षांमधील कथित अनियमिततेची सीबीआयद्वारे चौकशी व्हावी, अशीही त्यांची मागणी आहे. तर झारखंड उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाची न्यायालयीन छाननी तसेच सुरू असलेला सीआयडी तपास यांचा हवाला देत, या टप्प्यावर परीक्षा रद्द केली जाऊ शकत नाही, अशी भूमिका राज्य सरकारनं घेतली आहे.

**भरती परीक्षा सुधारणा**

महाराष्ट्रात विविध सेवा भरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, सुधारणा करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. मुंबईत यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते काल बोलत होते.

**निवडणूक प्रारूप**

महाराष्ट्रात मतदारयादी सखोल पुनरीक्षण प्रक्रियेअंतर्गत घरोघरी गणना पत्रे भरून घेण्याचं काम येत्या 17 ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे; 24 ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर नवीन नावे समाविष्ट करणे, नाव वगळणे तसंच दुरुस्ती करण्यासाठी एक महिन्याची मुदत मिळणार असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंग यांनी काल सांगितलं. या कालावधीत नवमतदारांसह सध्याच्या मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांनाही या प्रक्रियेत अर्ज करता येणार आहे.

**सी.बी.एस.ई.**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं काल इयत्ता बारावीच्या 2026 च्या पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर केला. विद्यार्थी results.digilocker.gov.in या संकेतस्थळावर आपला निकाल पाहू शकतात.

**पश्चिम बंगाल-ओबीसी**

पश्चिम बंगालमध्ये, तत्कालीन तृणमूल काँग्रेस सरकारनं जारी केलेली इतर मागासवर्गीय किंवा इतर मागासवर्गीय अ आणि ब वर्गातील प्रमाणपत्र कलकत्ता उच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवली आहेत. न्यायमूर्ती राजशेखर मंथा आणि न्यायमूर्यी अनुज यांच्या खंडपीठानं दिलेल्या निर्णयानुसार, राज्यात ओबीसी-अ आणि ओबीसी -ब हे वर्गीकरण अस्तित्वात राहाणार नाही. पूर्वीच्या प्रणाली अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची वैधता संपुष्टात आल्याचंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. या निर्णयानुसार, ही प्रमाणपत्र घेतलेल्या व्यक्ती आता खुल्या प्रवर्गातील मानल्या जातील.

**हातमाग-'सृजन'**

देशातील हातमाग उद्योगातील महिलांचा सहभाग अधोरेखित करण्याच्या उद्देशानं वस्त्रोद्योग मंत्रालयानं आज नवी दिल्लीत सृजन- व्हॉइसेस फ्रॉम द लूम या विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. विणकर महिलांच्या प्रेरणादायी प्रवासाची आणि देशाच्या विणकाम वारशाच्या योगदानाची दखल घेण्याच्या उद्देश या कार्यक्रमामागे आहे. दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमात वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या सचिव शमी राव सहभागी होतील तर 6 हातमाग समूहातील 100 हून अधिक महिला सहभागी होणार असून, त्या

आपले अनुभवकथन करणार आहेत. यावेळी महिला विणकरांच्या प्रवास आणि अनुभव कथनाचा संग्रह देखील प्रकाशित केला जाणार आहे.

**पाकव्याप्त काश्मीर**

पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधल्या नागरिकांची निदर्शनं आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याची चिन्हं दिसत आहेत. अवामी ॲक्शन कमिटीनं जगभरातल्या काश्मिरींना आज निदर्शनं करण्याचं आवाहन केलं आहे.पाकिस्तानी यंत्रणेकडून प्रायोजित केल्या जाणाऱ्या दहशतवादाकडं आंतरराष्ट्रीय समुदायाचं लक्ष वेधण्यासाठी रॅलींचं आयोजन करण्याचं आवाहनही करण्यात आलं आहे. गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या आंदोलनात सुमारे शंभर नागरिकांचा बळी गेला आहे, असं जम्मू-काश्मीर जॉइंट ॲक्शन कमिटीचे ज्येष्ठ नेते सरदार शब्बीर यांनी सांगितलं आहे.

**तिरंगा रॅली**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात ठिकठिकाणी तिरंगा यात्रेचं आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातल्या आदिवासीबहुल जळगाव जामोद तालुक्यात तिरंगा यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हजारो नागरिक, शाळकरी विद्यार्थी, शिक्षक यामध्ये सहभागी झाले होते.

नांदेड शहरातल्या यात्रेत विविध शाळांमधले हजारो विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, स्काऊट गाईडचे पथक आणि शिक्षक सहभागी झाले होते. बीडमध्ये तिरंग्याच्या रंगांनी सजलेल्या रॅलीमुळे शहरात राष्ट्रभक्तीचं वातावरण निर्माण झालं होतं. परभणी शहरात महानगरपालिकेनं तिरंगा रांगोळी स्पर्धेचं आयोजन केलं होतं.

**कांदाखरेदी बैठक**

कांद्याची खरेदी आणि साठवणूक प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल नवी दिल्लीत ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिवांची एक बैठक घेतली. यावेळी निकृष्ट कांद्याची विल्हेवाट लावण्याचे धोरण, बाजारातील परिस्थिती आणि वाजवी दरात कांद्याचा अखंड पुरवठा करण्यासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

**क्रिकेट**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात 13 ते 17 सप्टेंबर दरम्यान टी-20 क्रिकेट मालिका होणार आहे. नवी दिल्लीत हे सामने होतील, असं भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं काल जाहीर केलं.

**राष्ट्रकुल स्पर्धा**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत काल भारतीय तलवारबाजांनी 3 सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक मिळवलं. महिलांच्या वरीष्ठ गट फॉइल प्रकारात कनगलक्ष्मी हिनं सुवर्ण तर अशिथानं रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या वरीष्ठ गटात एपी प्रकारात राजेंद्रन शेर्जिन यानं तर सब्रे प्रकारात करन सिंग यानं सुवर्णपदक पटकावलं. सब्रे प्रकारात कुमारेसन पद्म गिशो निधी यानं कांस्य पदक मिळवलं. नायजेरियातील लागोस इथं होत असलेल्या या स्पर्धेत भारताला आतापर्यंत 29 पदकं मिळाली आहेत.

**हवामान**

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र तयार झाल्यामुळं हवामान विभागानं आज पश्चिम बंगाल आणि ओडिशासाठी अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला असून, या भागात अतिदक्षतेचा इशारा दिला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, पूर्व उत्तर प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, गुजरात, झारखंड, मध्य महाराष्ट्र, मध्य प्रदेशातही मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

# याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.